## प्रकरण तिसरे

## " तहान " मधील व्यक्तिचित्रण "

प्रस्तुत प्रकरणात " लहान " मधील व्यक्तिचित्रणाचा शोध घेण्याचे ठरविले आहे. कादंबरी " लहान " मधील व्यक्तिचित्रणाचा शोध घेताना व्यक्तिचित्रणे सामर्थ्यशाली आहेत असे जाणवते.

" लहान " मधील व्यक्तिचित्रणाचा शोध घेत असताना त्यांचे खालीलप्रमाणे गट पाडून शोध घेण्याचे ठरविले आहे. प्रस्तुत गट हे विवेचनाच्या सोयीसाठी पाडलेले आहेत.

- कष्ट करणा-या व्यक्तिरेखा
- लघु उद्योग करणा-या व्यक्तिरेखा
- भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या व्यक्तिरेखा
- पत्रकार म्हणून जगणारी व्यक्तिरेखा
- पोलिसांच्या व्यक्तिरेखा
- उठाठेव करणा-या व्यक्तिरेखा
- सामान्य माणसांच्या व्यक्तिरेखा

प्रथमदर्शनी वरीलप्रमाणे या कादंबरीतील पात्रांचे गट पाडलेले आहेत. यांचा सविस्तर विचार प्रस्तुत ठिकाणी करू.

## " तहान " कादंबरीत कष्ट करणाऱ्या व्यक्तीरेखा

ग्रामीण भागातील कष्ट करणाऱ्या माणसांच, प्राण्याचं वेगळं असं वेगळं विश्व सदानंद देशमुख चित्रित करतात. हे चित्रण करीत असताना तेथील प्रदेशाचे भान ते ठेवतात उदा. राघोजी शेवाळे हा हाडाचा शेतकरी आहे. शेती, बैल, औत, धान्य पिकवणे, शेतातं मरेपर्यंत राबणे हे त्याच्या आयुष्याचे रिंगण आहे. त्याची मुरल्या"-छबिल्या ही बैलजोडी पंचक्रोशीत प्रसिध्द आहे. कारण राघोजी स्वत: उपाशी राहूनं बैलांना खायला घालायचा. वेळचेवेळ भरपूर चारा, आलप-पाणी तर धायचा पण बैलाचा खरारा चुकायचा नाही. लदबदून मास असणारे त्याचे धिप्पाड बैल दावणीला बांधलेले बघितले, की पाहणाऱ्याला ते सांडासारखे दिसायचे.

आपली शेती, गुरे ढोरे याबाबत काही एक संस्कृती असणारी मूल्ये जपणाऱ्या पिढीचा प्रतिनिधी राघोजी शेवाळे आहे. आपल्या बैलजोडीवर प्राणाहून अधिक प्रेम करणारा त्यापुढे त्याला पैसा कस्पटा-समानं आहे.

राघोजी पाण्याच्या वेपार करणाऱ्या बैलांचे हाल पाहून तळमळतो पण तो एकटा बाकी सारे चैन करण्यात दंग आहेत. बैलांची पर्वा कोणाला नाही. बैल न्यायचे नाहीत हे राघोजीचं म्हणणं कुणी ऐकत नाही. इथे दोन मूल्य व्यवस्थेचा पहिला संघर्ष उडतो.

बायको मुलाच्या ओढाताणीत राघोजी मात्र संतापतो आहे. त्याला बैलांकडे पाहणारी खाटकाची दृष्टी वाटते. बैल मोडतील हे भय त्याला कुरतडं त्याचं वावर पोसणारे बैल सर्वस्व आहेत बायको मात्र त्याला घालून-पाडून बोलते, बेईज्जत करते म्हणूनं तो केविलवाणा होतो आहे. " खाटकीचा पैसा माणसाले एवढं बदलवते ? " त्याचं रक्त सळसळते बायकोची बडबड त्याचं काळीज कुरतडू लागते.

राघोजी म्हातारपणाने व बैलांच्या हडबडण्याने भयाकुल झाला आहे. त्याला आधी सुपारी खायला मिळेनाशी झाली. तो गारेचा तुकडा सुपारी म्हणूनं घोळू लागला. घरातील त्याची कर्ता पुरुष म्हणून किंमत संपली. खुद्द त्याची बायको घालून-पाडूनं बोलू लागली. राघोजीच्या शब्दात सांगायचे तर " पण गले कावूनं अंस घालून पाडून बोलती तू ! कावूनं आपेमान करती म्हा. पसरा म्हणाली. .जेऊन घ्या म्हणायचं तर गिळून घ्या म्हणती...काय चाललं हे ! "[२]

आता बबन घर चालवतं असल्यामुळे आपली किंमत दारात बसलेल्या कुत्र्यासारखी झाली, स्वत:च्या पोटाच्या आबाळापेक्षा बैलांच्या पोटाची आबाळ त्याला भेडसावू लागली. सांडासारखे जोपासलेले बैल हाडाचे सापळे राहिलेले पाहूनं त्याचे मन सैरभैर होऊ लागले. " काई खरं नाई रे देवा, आता मपल्या कुणाबिकाचं ...माझ्या सोन्यासारख्या बैलायले झाडाचा पाला खाऊनं जगण्याची पाळी आली...सम्दा खानाखराबा झाला...सत्यनास झाला..."[३] या त्याच्या उद्गारांत जातिवंत शेतक-यांची तळमळ, त्याचं प्राणीप्रेम लेखक सहजपणे मांडतो.

राघोजी मुरल्या-डबिल्यावर जीवापारं प्रेम करतो. बैलांवर असलेली त्याची माया आपल्या कुटुंबियापेक्षा अधिक आहे. शेती आणि बैल हेंच त्याच्या जगण्याचं बळ असतं. रामकोर आणि बबनं त्याला आपले शत्रु वाटतात. बबनचा पाण्याचा व्यवसाय बंद पडावा आणि आपल्या बैलाची कामातून मुक्तता व्हावी म्हणून तो गावातल्या पाण्यासाठी चाललेल्या मोर्चा-सभामध्ये सहभागी होतो.

मोर्चातं पाय मोडून बसलेल्या राघोजीला वाटतं कोणीतरी आपल्या जवळ बसाव, बोलत राहावं, बायको रामकोर तर आगभरल्या निखा-यासारखी, बबन पायाला भिंगरी बांधल्यासारखा सतत बाहेर. सगळीचं त्याला परकी-परकी वाटायला लागतात. " झाडावाणीचं

माणसाचं बी हाय, एका झाडाच्या बियातून दुसरं झाड उगवते...
पण ते पहयल्या झाडाच्या दूर-दूर फटकून उभं राहते तसचं..."[४]

त्याला माणसांची लागलेली तहान तशीच राहते.

राघोजी लाठीमारात तंगड तुटल्यानं लंगडा होऊन पडलेला असतो. राघोजीच्या घरी पाण्याचा थेंब नसतो. शेजारी पाणी देत नाहीत. ज्या बैलांवर आपण शेती केली, बबनने पैसे कमावले त्या बैलाभोवती आता कावळे घिरट्या घालू लागतात. राघोजीला मागचं सगळं आठवू लागत. शेवटचं उध्वस्त शिवारं माळावर पडलेली हाडं, गिधाडं, कावळे त्याची मांसावरील झडप आणि जमिनीतून उसळणारी पाण्याची धार हे दिवास्वप्नं अस्वस्थ करणारे आहे. सर्वांच्याचं तहानेचा असा उध्वस्त शेवट पाहून वाचकांच्या हृदयात कालवा कालवं सुरु होते हे देशमुखांचे लेखन कौशल्य खरोखरच वाखाणण्यासारखे आहे.

शेती हाच धर्म म्हणणारा, माणसं बदलली म्हणून रडणारा, परंपरावादी आणि बदलत्या परिस्थितीशी तडजोड न करणारा राघोजी शेवाळे ही व्यक्तीरेखा सदानंद देशमुख प्रभावीपणे चित्रित करतात.

बबन शेवाळे ग्रामीण जीवनात होणा-या परिवर्तनाचे बारकावे टिपणारा नायक आहे. ग्रामीण व्यवस्थेत जगताना अनेक ताणतणावं त्याला सहन करावे लागतात. काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे याबाबत त्याच्या मनात संभ्रम असतो तर कधी स्पष्टता असते. नागरी जीवनाची ओढ प्रचंड असते. तर कधी अस्तित्व गांगारुन टाकताना दिसते. बबन मात्र अभावग्रस्त कुटुंबात जन्मलेला नायक आहे. परिस्थितीशी जुळवून घेताना त्याला अनेक कष्ट सोसावे लागतात. त्याच्या मुळातल्या चांगुलपणाची कदर होत नाही म्हणून व्यवस्थेचा त्याच्या मनावर सतत दबाव येतो. मार्ग सापडत नाही म्हणून बबन घर सोडून निघून जातो.

देशराव बापू, गणेशराव भाऊ सारखी आधुनिक यंत्राने शेती करणारे शेतकरी बबनच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्याला सहकार्य करतात. या सा-या व्यक्तिरेखा देशमुख अत्यंत कौशल्याने चित्रित करतात.

" गुरल्या-ढबिल्या "
-------------

या कादंबरीला गुरल्या-ढबिल्या या व्यक्तिरेखाही वैशिष्टय-पूर्ण आहेत. राघोजी शेवाळेचं लहानसं कुटुंब असत. दोन मुलं, घरी शेती, बैल, गावात बैलाच नाव गुरल्या-ढबिल्या, गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावतो आणि राघोजीचा मुलगा बबनं बैलांचा वापर पाणी विकण्याच्या व्यवसायासाठी करतो. राघोजीच्या बबनच्या व्यवसायाला विरोध असतो. बैलांचा सतत वापर केल्यामुळे बैल निकामी होतील आणि आपला परंपरागत शेतीचा व्यवसाय नीटपणे करता येणार नाही, अशी भितीची भावना राघोजीला त्रस्त करते. तर बायको राजकोर बबनच्या व्यवसायाला प्रोत्साहन देते. बबनला आणि तिला बैलांच्या जीवाची पर्वा नाही " ते का पघळतात का उन्हांत ? "[5] ते का लोण्याचे गोळे हायेत का ? " असं ती म्हणते.

पाण्याच्या खेपा करणा-या बैलांचे हाल पाहूनं राघोजी तळमळतो बैलाची पर्वा कोणालाचं नाही. बैल न्यायचे नाहीत हे राघोजीचं म्हणणं कोणी ऐकत नाही.

पिराच्या चढावरुनं जीवाच्या आकांतन गाडी ओढून हाडकलेल्या, टायरनी पायावर जखमा केल्या आपल्या बैलांसाठी राघोजी जीव टाकतं राहतो. " हा पाणी विकण्याचा धंदा सोड " म्हणून मुलाच्या विनवण्या करतो.

खुरल्या-खिल्लारावर राघोजी जीवापाड प्रेम करतो. बैलावर असलेली त्याची माया कुटुंबियापेक्षा अधिक आहे. बैलाचं राबणं पाहून तो मनातल्या मनात सतत तळमळतो. शेती आणि बैल हेच त्याच्या जगण्याचं बळ असतं. बबनचा पाण्याचा व्यवसाय बंद पडावा आणि आपल्या बैलांची कामातून सुटका व्हावी म्हणून गावातल्या पाण्यासाठी काढलेल्या मोर्चा-सभामध्ये सहभागी होतो.

सांडासारखे जोपासलेले बैल, हाडाचे सापळे राहिलेले पाहून त्याचे मन सैरभैर होऊ लागते. " काई खरं नाई रे देवा, आता मपल्या कुणबिकाचं...माझ्या सोन्यासारख्या बैलायले झाडाचा पाला खाऊन जगण्याची पाळी आली...समद्‌ं खानाखराबा झाला...सत्यानास झाला.."[६] या त्याच्या उद्‌गारात बैलांच्या पोटच्या आवाज भेडसावू लागते.

माणसांच्या मतलबी, स्वार्थी उद्दिष्टापोटी प्राणी, जनावरे ही कशी जीवघेणी खेळ खेळून बसतात...ते सारे अस्वस्थ करून सोडणारे आहे. गावातील एक नंबरची ही जोडी...दिसेल तो चढ जिंकून चढण्याची त्यांची रग आणि कष्टामुळे होणारी देहझिज व त्यामुळे येणारी गात्र-गलितता, आजार, मारहाण-गोमाशा, गोचिडापासून तर कावळ्या-पर्यंत वाटयाला येणारी भयानक स्थिती यातून हे करूण चित्र उभे राहते. खरं तर हे चित्र हृदयाला पीळ घालणारे आहे.

बबनचे जाणे. .सहजपणे स्वीकारता येत नाही, कारण ज्या बैलांच्या साक्षीने हे कथानक सामर्थ्य होते त्या बैलांचाही प्रश्न सुटलेला नसतो. यातून खुरल्या-खिल्लार वाचका समोर जीवंत होतात.

" लघु उद्योग करणाऱ्या व्यक्तिरेखा -"

" लहान " कादंबरीत सारंगपूर नावाचे एक प्रातिनिधिक खेडेगाव आहे. गाव महामार्गाला जोडलेले असल्यामुळे शहरी संस्कृतीच्या छायेत विसावले आणि कालानुरूप बदल स्वीकारणारे आहे. बबन, प्रमोद, सतीश सारखे बेरोजगार गावातच लहान सहान व्यवसाय करतात. या उद्योग करणाऱ्या व्यक्तींचे चित्रण या कादंबरीत येते.

बबन शेवाळे स्वभावाने सरळ परंतु नागरी संस्कृतीच्या प्रभावात जगणारा तरुण आहे. पाणी टंचाईच्या काळात पाणी विकण्याचा व्यवसाय करतो आणि भरपूर पैसा मिळवतो. आणखी पैसा कमावण्याचे स्वप्न पाहतो. त्याला पैसाही भरपूर मिळतो. आणखी पैसा मिळावा म्हणून गुरल्या-कबिल्या या बैलांना राबवितो. त्यासाठी नवी गाडी तयार करुन घेतो. पिराचा चढ धोक्याचा असतो तरी पर्वा न करता तो पाण्याच्या खेपा वाढवितो. बबनचा व्यवसाय हा धोकादायक असून बरकतीचा नाही ही राघोजीची भावना असते. रामकोरच्या प्रोत्साहाने बबन आपल्या व्यवसायात रमून जातो बक्कळ पैसा मिळत असल्यामुळे झोपडपट्टीच्या रत्नावर तो पैसा उधळतो. गावातील उनाड आणि कुटील मंडळी त्याला एका कारस्थानात गोवतात आणि त्याच्या जवळचा सर्व पैसा लुबाडून घेतात. सोमनाथ हावरे, प्रमोद नवले, मोहन काळे रत्नाच्या प्रकरणांत ब्लॅकमेल करतात आणि कंटाळून तो गाव सोडून जातो.

प्रमोद नवले बी. ए. ची परीक्षा पास झाल्यानंतर नोकरीसाठी बरीच धडपड करतो पण त्याला त्यात यश येत नाही. नोकरी मिळत नाही म्हणून काही तरी धंदा सुरु करावा असा प्रमोद विचार करतो पण धंद्यासाठी पैसा नव्हता. गावात मुख्य रस्त्याला चाळीस बाय पन्नास फुटाची जागा होती बाकी काहीच नव्हतं.

जागा विकून त्या पैशातं बहिणीचं लग्न करतो, व बाकी पैशात स्टॅन्डच्या मागील बाजूस जागा घेतो. श्रामगांव रोडला सरकारी जागेवर अतिक्रमण करून सुरुवातीला पानाची टपरी घालतो त्यात विशेष असा जम बसतं नाही. नंतर त्याला सारंगपूरच्या पेपरची एजन्सी मिळते, मासिके, साप्ताहिके, स्टेशनरी यात थोडा जम बसला पाहता पाहता टपरीचं जनरल स्टोअर्स होत.

बबन शेवाळेच्या पाण्याच्या कमाईवर प्रमोद दात खाऊनं असतो. त्यावेळी तो म्हणतो, " आपून बी. ए. होऊन आपली कमाई काय त चाळीस, पन्नास रुपये....ते बी कधी हायेत कधी नाईत....अन् हे धसकट् तीन चारशे त सहज कमावतं आसलं...जास्ती पण कमी नाई .."[७]

सतिश मंगळे शिकूनही दलालापायी नोकरी मिळाली नाही म्हणून कुरूप मुलीशी हुंड्यापायी लग्न करून त्या पैशात गावात गॅरेज काढून काम धंदा करतो.

बबन शेवाळेला सतिश सांगतो भगवान भुसारी सुध्दा असलीचं गाडी तयार करायला सांगून गेला आहे. त्याला सुध्दा पाण्याचा धंदा करायचा आहे. बबन मनातल्या मनातं कुसातनं मोडल्या औतासारखा असतो त्यावेळी सतिश म्हणतो " आसचं चालते भौ आपल्या गावातं एकानं किराणा दुकानं टाकल की सम्देच टाकतात...चक्की...मॅटेडोर एकानं घेतलं की दुसरे घेतात. अन् मग सगळ्याचं धंधाच बडगं बसते. बसतात मग हारी हारी करत...गैंदीवळणा हाये नुसतं...मैंदीवळणा..[८]

भगवान होंगे किराणा मालाचा व्यापारी. किराणा दुकान चांगल ऐसपैस. रस्त्याच्या बाजूने दुकानाला लागून दरवाज्याच्या बाहेर ओटा. ओटयावर नेहमी गप्पा मारणारी माणसं असायची. रस्त्यानं येणा-या जाणा-याला काम नसलं म्हणजे बसायला ही हक्काची जागा.

बबन शेवाळेला पाण्याच्या धंधात जास्त पैसा मिळतो हे पाहून आपणही पाण्याचा धंदा करावा अशी कल्पना डोक्यात थैमानं घालत असते. वर्तमानपत्रात रोज येणा-या टंचाईग्रस्त बातम्या, लोंकानी पाण्यासाठी केलेलं उपोषण पाहूनं पाण्याचा धंधा करण्याचा विचार सोडून देतो.

उत्तम वांढरे व जगन तुपकर यांचे हॉटेल व ढाबा आहे. पाणी टंचाईच्या काळातं बबन शेवाळेकडून पाणी विकतं घेतात. कधी कधी बबनला पाणी देतो या मोबदल्यात खायला-प्यायला देत.

गावातं पाण्याचे टँकर सुरु झाल्यानंतर बबनकडूनं पाणी विकतं घेण्यापेक्षा टँकर ड्रायव्हरना कमी पैशात टँकरभरूनं रात्रीचे पाणी देत होते.

सारंगपूर गावातील मंडळी लहान, सहान व्यवसाय करणारी व्यक्तिचित्रण लेखक सदानंद देशमुख प्रभावीपणे मांडतात.

# " स्त्री व्यक्तिरेखा "

सदानंद देशमुखानी ग्रामीण भागातील स्त्री व्यक्तिरेखा प्रभावीपणे तहान मध्ये चित्रित केलेल्या आहेत.

बदलत्या ग्रामीण जीवनाशी तडजोड करण्यासाठी आपल्याचं स्वार्थात रंगून जाणारी रामकोर सदानंद देशमुखांनी रेखाटली आहे. रामकोर बबनच्या व्यवसायाला प्रोत्साहन देते. त्याने कमावून आणलेले पैसे आपल्या ताब्यात घेऊन घराची घडी नीटपणे बसवण्याची धडपड करते. स्वत:साठी दागिने तयार करते. नव-यापेक्षा आपला मुलगा आपल्याला सुख देणारा आहे ही भावनाचं तिच्या व्यक्तिमत्वातं बदल घडवून आणते आणि राघोजीच्या विरूध्द वागूनं राघोजीचे कुटुंबातील स्थान नगण्य करते. रामकोरची जडणघडण स्वार्थाने प्रेरित असल्यामुळे व-हाडातील एका वेगळ्याचं स्त्री चरित्राची मांडणी सदानंद देशमुखांनी केली आहे.

पैशाच्या जोरावर घरात टी.व्ही. पंखा, सोनं, टेपरकार्डर, रोजं मटणाचे जेवण यामुळे बबनची आई रामकोर बहिण वर्षा यांना भौतिक सुखाची पर्वणी आल्यासारखी वाटत. कधीतरी व नव-याच्या कारकीर्दीत पैसा भेटलेली ग्रामीण स्त्री बबनच्या रोज हजार, सातशे, पाचशे रूपयांच्या आवकेमुळे हरखून गेली व जास्त खेपा टाकण्यासाठी प्रोत्साहनं देऊ लागते. पाणी विकून कमाई बघूनं रामकोरची नजर बदलली आहे. बबनला आणि तिला बैलांच्या जिवांची पर्वा नाही. " ते का पघळतात का ? उन्हातं ? ते का लोण्याचे गोळे हायेत का ? "[२] असे राघोजीला सुनावते.

आम्ही चांगलं करतो लय पैसे कमावूनं आणालं त्याने तुमच्यावाणी न्हाई. वावरांत जायचं अन् दगड घेऊन यायचं"[10] असं ती म्हणाते. तुम्ही कमावले कधी एवढे पैसे बाप जल्मात। असा तिचा राघोजीला प्रश्न आहे.

पैशापाठोपाठ घरात टी.व्ही. येतो, रामकोरच्या अंगावर सोन्याचा डाग दिसू लागतो. खाण्यातील बेसन-भाकर जाऊन चमचमीत पदार्थ येतात नव-याचा पायोपदी उध्दार करणारी रामकोर बबनच्या कौतुकानं मोहरुन जाते. रामकोर, बबन मायलेकर आपल्याचं सुखात मग्न असतात.

पैसा मिळण्याच्या वेडान एकटा बबन खुळावला नाही तर त्याची आईही आता स्वप्नाची नादावली आहे. आपला मुलगा मुठीनं कमावतो म्हणून " तिच्या अंगाला मोराचे पिसारे फुटल्यासारखे झाले. पाण्याची धार दारात यावी तशी नोटांची धार दारांत येत होती"[11]

वर्षा भावाजवळ टी.व्ही. अन् टेपरकार्डरचा हट्ट धरते. आईलाही टी.व्ही. हवा आहे. आई बबनच्या खान्याची काळजी करते आहे. राहिलेली स्वप्न पूर्ण करण्यात रामकोर गुंतली आहे.

मोर्चात लाठीहल्ला होतो त्या झोंबाझोंबीत राघोजीचा पाय मोडतो. बायकोला वाटतं हा मोर्चात तडफडला, दवाखान्यावर खर्च झाला तेवढयात सोन्याचा दागिना झाला असता.

आई असून पैसा आणणा-याचं मायेचा वर्षाव करणारी रामकोर, टी.व्ही. टेपरेकार्डर या स्वप्नात दंग होत तारुण्य दवडणारी वर्षा, रामकोर व राघोजी यांचे ताणातणाव सदानंद देशमुखांनी वास्तव पातळीवर टिपले आहेत.

रत्ना झोपडपट्टीतल्या तोताराम गालफाडेची तरुण मुलगी अमरावतीला मावशांकडे की बहिणीकडे राहत होती. ती सारंगपूरात पाणी टंचाईच्या काळात येते.

पाण्यासाठी दाही दिशा फिरावं लागतं. एक दिवस झोपडपट्टीतल्या राधी अन् गोदी कडून उंबरनाल्यात पाणी मिळतं असं तिला सांगतात. रत्ना उंबरनाल्यात येते. पाणी शोधते पण तिला पाणी मिळत नाही. ती रडायला लागते त्यावेळी बबन शेवाळे तिथं असतो. तिला पाहताक्षणी बबन तिच्या प्रेमात पडतो. रडणाऱ्या रत्नाला बबन शांत करतो. तिला पाणी देतो. ती पाण्याचं पैसे विचारते पण बबन तिला रोज इथं भेटण्यास येण्यास कबूल करून घेतो.

रत्ना रोज पाण्यासाठी उंबरनाल्यात यायची. रत्ना व बबन दोघांमध्ये हळूवार नाते निर्माण होते. बबनला रत्नाच्या शरीराची तहान आहे. तर रत्नाला बबनच्या पैशाची, दागदागिन्यांची तहान आहे. म्हणूनचं फुकटांत पाणी घेऊनं झाडीत बबनची तहान भागविते.

रत्ना व बबन यांच प्रकरण रत्नाचा बाप तोताराम यास समजते त्यावेळी तोताराम रत्ना व बबन यांना मारहाण करतो.

रामकोर, पर्बी व रत्ना या व्यक्तिरेखा लेखकाला अधिक सखोल करता आल्या असत्या तर कादंबरीची उंची आणखी वाढली असती.

पाणी टंचाईच्या काळात वणवण फिरूनं पाणी मिळवणं हेच काम होऊन जात. जमा केलेलं पाणी पर वाया जात असेल तर या बायमाणसं आपल्या मुलांना मारताना दिसतात .

मिनाक्षी-भगवान होंगेची पत्नी लहान मुलानं टमरेल भरून पाणी सांडलं म्हणून मारते.

" ह्या दलिंद-पावाण्याच्यानं टमरेल भरूनं चालवलं व्हतं परसाकडीले...ढुंगण धुवायो. ..त्याले म्हणलं, तेवढं पाणी नको नेऊ. त रागारागानं टमरेल फेकलं वातल्डयानं, अनू समदं पाणी सांडवलं पाणी का फुकासुखी येते का बाबु घरात ?....[१२]

हुकलेल्या नंबरसाठी, जुनी दुश्मनी काढण्यासाठी उंबरहांडेची द्वारका व ज्ञानदेव मोहळची तारा एकमेंकीचं केस धरुन भांडण लागली होती. या भांडणात पाखरेची सुनिता तिच्या बहिणीला हाताशी घेऊन पाणी हापसंत होती

झोपडपट्टीत राहणा-या मोतिराम बोरकराची राधी अनू सुदामा कदमाची गोदी सगळ्या गावात भटकत राहायच्या. पोरीचा नट्टापट्टा भडक रंगाचा, भडक टिकली, डोळ्यात काजळ असा या दोघी गावातून फिरुन बातम्या गोळा करायच्या अनू पैसे मिळवायच्या।

ग्रामपंचायतीला भिमराव गोवडेच्या पॅनेलमधून निवडणूक जिंकलेली मेंबरीन जनाबाई सगळ्या बायकांत धीटपणे बोलणारी म्हणून ओळखली जायची. बोलायला दहा माणसांना भारी पडायची. तिच्या जिभेची कुवत सगळ्या तारंगपूरला माहित होती. आमदारांच्या भेटीत " स्त्रियां" साठी स्वतंत्र संडासाची मागणी करते.

सखाराम गुंजकराची थेडसर मुलगी गंगा रखरखत्या उन्हात हापशाचा दांडा जीवाच्या आकांताने हलवतं होती. मध्येच पाणी येत का पाहतं होती. गोंधळीच्या हापशीवर आपणाला कोण नंबर लावू देत नाही म्हणून ती राघोजीच्या घरासमोरील हापशीवर आलेली असते. तिथे आपण एकट्या आहोत दुसरं कोणी नाही हे पाहून तिला आनंद होतो पण त्या हापशीला पाणीचं नसत.

ग्रामीण भागातील वगवेगळया स्त्री चित्रण लेखक चित्रित करतो त्यामुळे कादंबरीचे मूल्य वाढते.

" पत्रकार " म्हणून जगणारी व्यक्तिरेखा "

माणसाचे जगणे समजावून घेऊनं त्याच्या जगण्यातील ताण-तणाव सदानंद देशमुख चित्रित करतात. समस्येने ग्रासलेल्या पत्रकार म्हणून जगणाऱ्या प्रमोद नवलेचे व्यक्तिचित्रण करतात.

प्रमोद नवले हा बी. ए. झालेला तरूण नोकरीसाठी बरीच धडपड करतो पण त्याला त्यात यश येत नाही. तरूणासारखा पोरगा नुसता फिरतो अन् संध्याकाळी मोकाट सांडासारखा घरी येतो त्यामुळे घरात बापाचा कलकलाट व्हायचा. गावातल्या शाळेत चपराशाची नोकरी करणारा बाप तेवढाचं मिळवायचा पण तेवढयानं घर भागायचं नाही. प्रमोदला दोन भाऊ, एक बहिण, आणि आई-वडिल एवढा त्यांचा संसार होता. घरी शेतीवाडी नाही. गावातं मुख्य रस्त्याला चाळीस बाय पन्नास फुटाची जागा होती बाकी काहीचं नव्हत.

नोकरी मिळतं नाही म्हणून काय तरी व्यवसाय करावा असा विचार प्रमोदच्या मनात येतो. पण धंद्यासाठी भांडवल उभ करण्यासाठी गावातील मुख्य रस्त्यावरची जागा छगनशेठला पन्नास हजारात विकतो. बसस्टॅन्डच्या मागच्या बाजूला नव्याने प्लॉट पडलेले असतात. मुख्य रस्त्यापासून मागच्या बाजूला होते त्यामुळे कमी पैशातं दहा हजारात तेवढाचं प्लॉट घेतो.

बस स्थानकाजवळच्या प्लॉटवर टिनाचं, कुडाच्या भिंतीच बांधतो राहिलेल्या पैशातलं लग्नाला आलेल्या बहिणीचं लग्न करतो. चार-सहा हजार हातात उरतात त्यात टपरी तयार करून घेतो व खांमगाव रोडला सरकारी जागेवर अतिक्रमण करून उभी करतो. पहिल्यांदा टपरींत पानपट्टी सुरु करतो. पण विशेष जम बसत नाही. मग त्याला सारंगपूरच्या पेपरची एजन्सी मिळते.

नागपूरच्या वर्तमानपत्रांना गावात मागणी होती. व्यापारी, सरकारी कर्मचारी, जुने वर्गणीदार, नवे काही मिळवले मग मासिके, साप्ताहिके पार्सलने बोलवून घेतली यात बराच जम बसतो. त्यातच स्टेशनरी सामानं विक्रीसाठी ठेवलं पाहता पाहता टपरीचं जनरल स्टोअर होत.

" जनवार्ता " ह्या जवळच्या शहरातून निघणाऱ्या वृत्तपत्राचे वार्ताहरपद त्याने मिळविले. सततत्याने बातम्या लिहून भागातला " वार्ताहर " म्हणून तो चांगला प्रसिध्दीला आला. लोक त्याला " पत्रकार " म्हणायचे तेंव्हा त्याला बर वाटायच.

" आपनं बी. ए. होऊन आपली कमाई काय त चाळीस, पन्नास, रुपये. ..ते बी कधी हायेत कधी नाईत...[13] ही व्यथा मनाला जाचते.

पाणी टंचाईच्या भयानक दिवसांत जिथं पिण्यास पाणी मिळतं नाही तिथं आंघोळीला तरी पाणी कुठलं ? त्यावेळी तो म्हणतो, " काय सांगू " आठ रोजापासून मपला संसार बंद हाये ह्या पाण्या-पायी आंघोळच बंद हायेत. पुलावरच्या हापशीचं प्यायपुरतं पाणी कसंतरी घरातले आणतात.....[14]

घरातील गरीब परिस्थिती, पाणी टंचाईनं होणारा कोंडमारा। त्यामुळे पाणी विकतं घेणं शक्य नाही, " मी का नवकरीवाला हाये का काय ? . वाली कमाईचं काय हाये आपली। पेपरचं पंधरा वीस टक्के कमिशनं...अन् स्टेशनरीचं झुकूड फुकूड धंदा वातहिरला असं कमिशन असते जाहिरातीचं...पण आपल्या ह्या दलिद्रं गावातं कशाच कमिशन ? आपलं गाव म्हणजे धा धड शहर, ना धड खेडे ?.. ..[15] ही व्यथा प्रमोद सांगून जातो.

पाणी टंचाईच्या काळात गावातल्या, भागातल्या ब-याच बातम्या देतो. पत्रकार म्हणून मिरवणारा प्रमोद नवले गावभरातल्या पंचायती करणा-या मोहन काळे व पोलिस सोमनाथ यांच्या मदतीन बबन शेवाळेला रत्ना प्रकरणांत ब्लॅकमेल करतो. बबनकडून पत्रकार म्हणून प्रमोद आर्थिक लूट करून घेतो.

ग्रामीण भागातील " पत्रकार " म्हणून जगणारी व्यक्तिरेखा लेखक सदानंद देशमुख वास्तव पातळीवर चित्रित करताना दिसतात.

" पोलिसांच्या व्यक्तिरेखा "

ग्रामीण भागात पोलिस म्हणून धाक दाखवून हॉटेलवाले, ढाबेवाले यांच्याकडून हप्ते गोळा करणारे तर शेतक-यांना एखाद्या गुन्हयाची भीती दाखवून पैसे मिळविणारा पोलिस सोमनाथ हावरे. ही व्यक्तिरेखा लेखक सदानंद देशमुख रेखाटतात.

सारंगपूरच्या पोलिस स्टेशन मधला सोमनाथला नट-नटयांची चित्रे असणारी साप्ताहिके, मासिके विकत घ्यायची सवय असल्यामुळे तो प्रमोद नवलेच्या दुकानावर जायचा त्यातून पत्रकार असणा-या प्रमोदशी सोमनाथ पोलिसशी मैत्री होते.

पाणी टंचाईच्या दिवसात बबन शेवाळे आपणाला पोलिस म्हणून फुकट पाणी, किंवा त्यात सुट देत नाही याची खुनस मनाशी बाळगतो.

बबन शेवाळेला रस्ता प्रकरणाशी ब्लॅकमेल करुन दहा हजाराची मागणी करतो. बबनने फुकट पाणी दिल नाही किंवा त्यात सवलत दिली नाही याचा राग बबनवर काढतो. बबन सोमनाथच्या पाया पडतो पण याला काही पाझर फुटत नाही. बबनकडून आर्थिक लूट करुन बसतो. पोलिसांच्या भितीपोटी बबन पैसे देण्याचं कबूल करतो.

ग्रामीण भागात "पोलिस" म्हणून लोकांना भिती दाखवून बबनसारख्या लोकांना गावातून परागंदा करण्यास प्रवृत्त करतो.

गावामध्ये पाण्यासाठी आमरण उपोषणाला बसलेल्या लोकांच्या सुरक्षितेसाठी हजर असलेला पोलिस म्हणतो " तुमच्यापेक्षा त आमाले जास्त गांजून राहयली ही पाणी टंचाई...हकनाक या खल्डा पोल गावात बदली झाली आस वाटते. तिकडी बाहेर गावात सम्द बराबर मिळते। "[१६]

सदानंद देशमुखांनी ग्रामीण भागातील पोलिस प्रभावीपणे चित्रित केलेला आहे.

## " उठाठेव करणाऱ्या व्यक्तीरेखा "

ग्रामीण भागात उठाठेव करतचं माणस जगत असतात मोहन सारखा मतलबी वृत्तीचा तर भिमराव शेवडेचं राजकारण, नंदू आळशी व गुलाब भालेराव यांच्या समाजाविषयी असणारी आस्था सदानंद देशमुखांनी प्रभावीपणे चित्रित केलेली आहे.

मोहन काळे सारखा तरूण मॅट्रीक न होता गावच्या पंचायती करणारा, रिकामटेकड्या मोहनाला घरादाराची चिंतानव्हती. नुसत इकड तिकडं फिरतं रहायचा इकडच्या बातम्या ताबडतोब तिकडं कळवायचा बबनं शेवाळेंच रत्ना प्रकरण शोधून आपल्या मित्रांच्या प्रमोद व सोमनाथ यांच्या मदतीनं बबनकडून आर्थिक लूट करण्यात सहभागी असतो

मतलबी वृत्तीचा मोहनं गावभरातल्या बातम्या गोळा करून लोकांची फजूनं करून पैसे मिळवतो. गावातचं काही तरी उठाठेवं करून जगत असतो.

भिमराव शेवडे पाणी टंचाई ग्रस्त गावातं पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी वर्तमान पत्रात वरचेवर प्रसादेला बातम्या छापायला सांगतो.

भिमराव शेवडे ग्रामपंचायत सदस्य असल्यामुळे पुरेशा संख्याबळामुळे सरपंच झाला नसल्यामुळे विरोधी सरपचावर अविश्वास ठरावं आणण्या-साठी गावातील तरूणांना एकत्र करून उपोषण, मोर्चा यात सहभागी होतो. तालुक्याच्या गावातुंन पिण्याच्या पाण्याच्या टॅंकरची व्यवस्था करतो.

नंदू आळशी व गुलाब भालेराव हे दोघे जण वर्तमानपत्र वाचूनं दाखवून जिल्हयातील पाणी टंचाईमुळे लोकांची होणारी कोंडी, लोकाचे होणारे हाल, गुरे, ढोरे, शेत-शिवार यावर पाण्यामुळे यांची होणारी कुचंबणा यावर गप्पा मारत असतात.

पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी नंदू आळशी व गुलाब भालेराव ग्राम विकास समितीला मदत करतात.

ग्रामीण भागात उठाठेव करुनं जगणारी माणसे सदानंद देशमुख रेखाटताना आपणास दिसतात.

" सामान्य माणसांच्या व्यक्तिरेखा "

पाण्यासाठी दाहीदिशा फिरणा-या माणसाचं, गावाचं सदानंद देशमुखानी प्रभावी चित्रण केले आहे. माणसा माणसातील प्रकृती-विकृती मात्र यथातथा मांडल्या गेल्या आहेत.

पिराचा चढ किती अवसानं घातकी आहे याचे दाखले देण्यासाठी लेखक सदानंद देशमुख योग्य अशा व्यक्तिरेखाच्या माध्यमातून सांगताना दिसतात. शफीक ड्रायव्हर हा देवराव बापूच्या ट्रॅक्टर ड्रायव्हर एकदा पिराचा चढ उतराना ट्रॅक्टर कोलमडून उलटी-पालटी होतो त्यात शफीक ड्रायव्हरचा हात मोडतो. तो अजूनही आपला लुळा हात घेऊन फिरतो.

किशोर होगे हा पिराच्या चढाला जांभळीचे डहाळे आणण्यासाठी आणलेली गाडी एकदम मागे सरकली गाडी उलटीपालटी खालच्या डोंगर दरीत पडून तो गाडीखाली दबून जखमी झाला नंतर तो दोन महिन्याच्या आजारात खलास झाला.

पाणी टंचाईच्या काळात सामान्य माणसांची व्यथा लेखक प्रभावीपणे मांडतात.

लक्ष्मण होगेच्या ओटयावर बसलेले लोक पिण्यास पाणी मागतात त्या वेळी तो म्हणतो " ते त नाई जमनार हो भटजीबुवा...वाटलं त जेवून जा आमच्या घरुन. पण पाणी नका मांगु गिलासभरबी... पाणीचं नाई घरात. आमीच त तहान लागली की एका एका घोटात नरडा अन् होठ वल्ले करुन आल्यावाणी करतो...[१७]

भगवान होगेच्या किराणा दुकानाच्या ओटयावर नंदू आळशी पेपर वाचून दाखवतो त्यात गोविंदा ताजणे, संभाजी चिकणे, किशोर माळोदे, वसंत पाटील, शिवराम मामा यासारखी मंडळी वर्तमानपत्रातील बातम्या ऐकून राजकीय विषयावर, पाणी टंचाईमुळे होणा-या हानी ऐकून हळहळताना दिसतात.

हुकलेल्या नंबरसाठी हापशीवर भागडलेली बायकांची भांडण पाहणारा कासमभाई काहीचं करु शकत नाही.

पाण्यापायी आपली तरणीसाठी पोरगी विहिरीत पडून गेली म्हणून दुखी झालेला कुत्तरवाडीचा रामा उमाळे. तर पाणी पुरवठा गावाला व्यवस्थितीत सुरु आहे हे कागोदपत्री दाखवून शासनाचे पैसे उचलणारा पंचायत समितीचा सभासद धनाजी काळबांडे प्रभावीपणे रेखाटला आहे.

पिण्याच्या पाण्याची अजूनही सोय उपलब्ध होत नाही म्हणून संतप्त गावकरी ग्रामपंचायत कार्यालयावर जातात तर तेथे सरपंच, ग्रामसेवक, उपस्थितीत नसतात पण हजर असतो तो ग्रामपंचायतीचा शिपाई सावळया याला लोक मारहाण करतात.

बबन शेवाळे रस्त्यानं येताना पाहून कडबा जळाल्याची घटना सांगणारा निलेश सावदडकर. गणेशराव भाऊ बबन शेवाळेचे शेजारी शेतीच्या कामात किंवा बबनच्या सुख-दुःखात सहकार्य करणारी व्यक्ती.

भिमराव बापू शेवडे, माधवराव घेवडे, दिनकर दवाडे, मधुकर पालवे, धोंडूबा यासारखे युवक गावामध्ये पाण्यासाठी अमरण उपोषण करण्यास तयार होतात.

श्याम पाटील, धोंडूबा सानपचा बाप, राघोजी या सारखी म्हातारी माणसं उपोषणकर्त्या मंडळींना धीर देतात.

पुंजाजी जुमडे आपल्या पिढीपायी पारखेड गावाला आग लागली म्हणून वेड लागल्यासारख ओरडत राहतो. शेवटी बैलांच्या कास-यानचं फाशी लावून मरतो.

सुधाकर दाभाडे दवंडी देणारी व्यक्ती गावामध्ये विकास समिती, घागर मोर्चा यांचे आयोजन याची दवंडी देत असतो.

अजय कुलकर्णी विकास समितीचा अध्यक्ष, एन. टी. देशमुख, अशोक धारकर, पंकज जाधव, रणजीत सुर्यवंशी, प्रकाश निकम, यशपाल वरठे ही नव्या दमाचे तरुण गाव विकास समितीची स्थापना करतात. घागर मोर्चा, उपोषण, करतात. पारखेड गावाला जळीत पाहण्यासाठी आलेल्या आमदार, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्याकडे आपल्या मागण्यांचे निवेदन देतात.

आमदार गेल्या दहा वर्षापासून या मतदार संघातून निवडून जातो. संतप्त लोकांना समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. पण लोकांना टंचाईची झळ पोचल्यामुळे लोक सभा उधळून लावतात.

ग्रामसेवक तालुक्याच्या गावाला बंगला बांधून राहतं असतो. गावाच्या कामात लक्ष नाही. संतापलेले लोक आमदाराच्या सभेमध्ये मारहाण करतात.

पांडूरंग कांबळे गावात झालेली दंगलीची बातमी बबन शेवाळेला सांगतो. त्यात राघोजीला [illegible] दुखापत झाली म्हणून सांगणारी व्यक्ती.

राघोजीच्या पायाला दुखापत झालेली असते त्यावेळी भेटायला आलेल्या शिवराम यादव, तेजराव मोरे, लक्ष्मण माने दंगलीची चर्चा करतात शिवराम यादव म्हणतो " बरं झालं राघोजी बुवा जिवावरचं पायावर निभावलं ".[१८] दंगलीत पाय दुखावलेल्या राघोजीला आपली काळजी नाही तर बैलांना आलप, चारा, पाणी दिला का याची विचारणा करतो त्यावेळी तेजराव मोरे म्हणतो " वारे वा। पाहा किती माया हाये राघोजीची बैलावर... ".[१९]

अकोल्याच्या दवाखान्यात बापाजवळ भावकीतलं कोणतरी असावं म्हणून बबन सुभाष शेवाळेला बरोबर घेतो. सुभाष दवाखान्यात राघोजीजवळ न बसता सारखा शहरात भटकायचा.

संपत देवकुळे बबन कडूनं वरचेवर पैसे मागून घ्यायचा अन् दारु पियाचा. सखाराम हा देवरावं बापूच्या शेतातली गडी बबनची गाडी भरुन देणारा.

तोताराम गालफाडे रत्नाचा बाप झोपडपट्टीत राहणारा. रत्नाचं प्रकरण समजताचं उंबरनालयात रत्ना व बबन शेवाळे याना पाहून दोघानाही मारहान करतो. बबनला पोलिसांच्या स्वाधीन करतो.

गजानन महाजकेचं उंबरनाल्याजवळ शेतात झोपडी असते. या झोपडीत पोलीस सोमनाथ बबनबरोबर रत्ना प्रकरणाशी चर्चा करतो.

नरशा अन् दिलप्या यांना बबन घरावर चढून टी.व्ही. अँन्टिना काढायला लावतो.

बबन शाळेचा वर्गमित्र जगन वानखेडे हा बबन बरोबर कधी रोजगाराला शेतावर यायचा. टायफड झाला, मग कावीळ होऊन जगनं गेला त्याची आई तरणाताठा पोरगा गेल्यानं रडत असते.

पाणी टंचाईच्या काळात बबनकडून पाणी विकत घेणारे गावातील वरठे गुरुजी.त्यांचा अर्धा पगार पाण्यावरचं खर्च व्हायचा.

गोविंदा बबनच्या भावकीतला तरूण बबनकडे पैसे मागायला येतो पण बबन नाही हे पाहून राघोजीकडं निरोप ठेवून जातो.

ग्रामीण भागातील अभावग्रस्त परिस्थितीत जगताणा त्यांचे भाव-भावना लेखक सदानंद देशमुख वास्तव पातळीवर रेखाटताना दिसतात.

## " सदानंद देशमुखांच्या व्यक्तिचित्रणातील विशेष "

सदानंद देशमुखांनी चित्रित केलेल्या व्यक्तीरेखांचा विचार या प्रकरणात केला त्यांच्या व्यक्ती चित्रणातील ठळक विशेष पुढील प्रमाणे.

देशमुख व्यक्तिरेखा जिवंत करण्याचा प्रयत्न करतात त्यांनी वापरलेली व्यक्तिचित्रणे जिवंत करण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी वापरलेली व्यक्तिचित्रणे गरजेची वाटतात. त्यांचे मानसिक जगणे सूक्ष्मपणे चित्रित करण्यात रस असल्यामुळे त्यांचे शरीर वर्णन अधिकसे करत नाहीत

पात्रांतील श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव त्यांच्यासमोर दिसत नाही. देशमुख सर्व व्यक्तिरेखांचे चित्रण समभावातून करतात. कोणत्याही व्यक्तीचे अमूक एक वर्तन चांगले आणि अमूक एक वर्तन वाईट अशी विभागणी व्यक्तिचित्रणात ते करत नाहीत. सर्वच व्यक्तिचे वर्तन तसेच मुळ स्वरूपात कादंबरीत मांडतात. त्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती वशाच्या तशा मांडतात. मानवी जीवनाचा व्यापक पट मांडून जातात.

व्यक्तिचित्रणात मानवतावादी दृष्टिकोण ठळकपणे जाणवतो. माणसांचे जगणे हा देशमुखांचा अस्थेचा विषय आहे. माणसाचे जगणे समजावून घेऊन आकलन मांडण्यात रस आहे माणसाच्या जगण्यातील गुणावगुण ते मांडतात.

माणसाच्या प्रवृत्ती, जगण्याचे वास्तव मुलाखतीत वाचकासमोर ठेवून ते वाचकाला त्याबाबत विचार करायला लावतात.

व्यक्तिचित्रणात व्यक्तीच्या जगण्याचे आकलन मांडत असताना लेखकाचे भाष्य कोठेही येत नाही. व्यक्तीचे चित्रण थेटपणे करण्यात रस आहे. व्यक्तीच्या जगण्यातील तपशील वाचकासमोर मांडताना दिसतात.

व्यक्तीच्या मनातील भावना, विचार प्रकट करण्यासाठी संवाद, आत्मसंवाद, चिंतन आणि निवेदनाचा वापर करतात. माणसांच्या मनातील ताणतणाव, गुंतागुंत, मानसिक पातळीवरील वर्तमान नेमकेपणाने चित्रित करतात.

देशमुखांनी स्त्री व्यक्तीरेखा मांडताना अधिक गडद केल्या असत्या तर कादंबरीची उंची आणखी वाढली असती.
( रामकोर, वर्षा, रत्ना. )

सारांश : तिस-या प्रकरणामध्ये " तहान " मधील व्यक्तिरेखांचा अभ्यास केला आहे. " तहान " मधील व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना सोयीसाठी खालील विभागणीचा आधार घेतलेला आहे.
१. कष्ट करणा-या व्यक्तिरेखा २. लघु-उद्योग करणा-या व्यक्तिरेखा ३. स्त्री व्यक्तिरेखा ४. भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या व्यक्तिरेखा ५. पत्रकार म्हणून जगणारी व्यक्तिरेखा ६. ग्रामीण भागातील उठाठेव करणा-या व्यक्तिरेखा ७. पोलीसांच्या व्यक्तिरेखा ८. सामान्य माणसांच्या व्यक्तिरेखा. या मुद्याच्या अनुषंगाने विविध पात्रांचा परिचय, स्वभाव व वैशिष्ट्यानुसार करुन दिलेला आहे. त्यांच्या सर्व लकबीसह चितारलेली आहेत त्यांचा आढावा घेतलेला आहे.

कष्ट करणा-या व्यक्तिरेखांमध्ये शेती जीवनाशी एकनिष्ट, परंपरावादी आणि बदलत्या परिस्थितीशी तडजोड न करणारी व्यक्तिरेखा राघोजी शेवाळे आहे. मुरल्या"छबिल्या ही बैलजोडी अंत्यत ताकदीने रेखाटलेली आहे.

लघुउद्योग करणा-या व्यक्तीरेखांमध्ये मुख्य व्यक्तिरेखा बबन शेवाळे आहे. बबन अभावग्रस्त कुटूंबात जन्मलेला नायक आहे. परिस्थितीशी जुळवून घेताना अनेक कष्ट सोसावे लागतात. त्यांच्या मुळातल्या चांगुलपणाची कदर होत नाही. म्हणून व्यवस्थेचा त्याच्या मनावर सतत दबाव येतो आणि मार्ग सापडत नाही म्हणून घर सोडून जातो. बबनसारखे अनेक तरुण सतिश, प्रमोद, सुतारी होगे, हॉटेलवाले ढाबेवाले लघुउद्योग करुन या व्यक्तिरेखा ग्रामीण भागात जगताना पाहिल्या आहेत.

स्त्री व्यक्तिरेखात बदलत्या परिस्थितीशी तडजोड करणारी, आपल्यांच स्वार्थात रंगून जाणारी रामकोर देशमुखांनी रेखाटलेली आहे. वर्षा, रत्ना यासारख्या स्त्री व्यक्तिरेखा पाहिल्या.

भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या व्यक्तिरेखामध्ये बबन, प्रमोद, सोमनाथ, मोहन सारखे तरूण रत्नासारखी व्यक्तिरेखा भौतिक सुखाच्या मागे लागून जूने सर्व नाकारून जगताना दिसतात. यांच्या चित्रणातून नव्या पिढीच्या अनेक समस्या देशमुख शब्दबध्द करतात.

ग्रामीण भागात उठाठेव करणा-या व्यक्तींचा एक स्वतंत्र गट असतो यांच्या उठाठवी गावच्या समूह जीवनावर परिणाम करीत असतात. त्यामुळे गावचे वातावरण ढवळून निघते. " तहान " मध्ये पाणी टंचाईवर मात करण्यासाठी भिमराव शोपडेचे राजकारण सुरु होते. यातून गावातून नवेच ताण निर्माण होतात. याचे चित्रण देशमुख करतात.

सामान्य माणसं दुबळी, दुष्काळाच्या चाहुलींन शहारलेली, कोरड्या उष्ण वातावरणात माणसांची मनही कोरडीठ्ठाण, वांझोटी, निबर, झालेली दिसतात. ग्रामजीवन, कृषीकेंद्री वातावरण यातून हे तहानलेले कोरडेठ्ठण विश्व जाणवते. या सामान्य माणसांचे चित्रणही देशमुख सहानुभावाने करतात. प्रकरणाच्या शेवटी देशमुख यांच्या व्यक्तिचित्रणाची वैशिष्टये नोंदवली आहेत.

# प्रकरण तिसरे

## संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १. | देशमुख सदानंद | " तहान " पुणे,, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९९८, प्र.आ. पृ. ९. |
| २. | तत्रैव | तत्रैव पृ. ८ |
| ३. | तत्रैव | तत्रैव पृ. १२९ |
| ४. | तत्रैव | तत्रैव पृ. १३३ |
| ५. | तत्रैव | तत्रैव पृ. ७ |
| ६. | तत्रैव | तत्रैव पृ. १२९ |
| ७. | तत्रैव | तत्रैव पृ. १४७ |
| ८. | तत्रैव | तत्रैव पृ. ६६ |
| ९. | तत्रैव | तत्रैव पृ. ७ |
| १०. | तत्रैव | तत्रैव पृ. ७ |
| ११. | तत्रैव | तत्रैव पृ. ६ |
| १२. | तत्रैव | तत्रैव पृ. १६ |
| १३. | तत्रैव | तत्रैव पृ. ४७ |
| १४. | तत्रैव | तत्रैव पृ. ४९ |
| १५. | तत्रैव | तत्रैव पृ. ४४ |
| १६. | तत्रैव | तत्रैव पृ. ७८ |
| १७. | तत्रैव | तत्रैव पृ. १५ |
| १८. | तत्रैव | तत्रैव पृ. १२२ |
| १९. | तत्रैव | तत्रैव पृ. १२४ |